


महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कार्यकारी संपादक : श्री. विजय यादव | jeevandeepvartanews2020@gmail.com | Rs.2/- | मुख्य संपादक : श्री. रविंद्र घोडविंदे

शुक्रवार ❖ ०६ डिसेंबर २०२४ ❖ वर्ष ६ ❖ अंक - १६१ ❖ पाने - ४

RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024


# महाराष्ट्र आता थांबणार नाही..!

# राज्यात देवेंद्र पर्वाचा शुभारंभ!



## देवेंद्र फडणवीस तिसऱ्यांदा मुख्यमंत्री

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता □ प्रतिनिधी**


महाराष्ट्रात आता देवेंद्र पर्वाला सुरुवात झाली आहे. भाजपचे नेते देवेंद्र फडणवीस यांनी आज तिस-यांदा महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. देवेंद्र फडणवीस यांच्यासह महाराष्ट्राचे मावळते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख अजित पवार यांनी देखील उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासह केंद्रीय मंत्रिमंडळातील मंत्री, २२ राज्यांचे मुख्यमंत्री, देशभरातील शेकडो दिग्गज व्यक्ती, साधू-महंत आणि ४० हजार नागरिकांच्या उपस्थितीत भव्य शपथविधी सोहळा पार पडला. या कार्यक्रमात विविध ठिकाणी 'महाराष्ट्र आता थांबणार नाही' असं लिहिण्यात आलं होतं.

दरम्यान, नव्या सरकारमध्ये देखील जुनाच पॅटर्न कायम ठेवण्यात आला आहे. नव्या सरकारमध्ये एक मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री आहेत. देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. मात्र एकनाथ शिंदे हे उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार का याबाबत मोठा सस्पेन्स निर्माण झाला होता. शपथविधी सोहळ्याला अवघे काही तास शिल्लक असेपर्यंत हा सस्पेन्स कायम होता. मात्र भाजप नेते आणि शिवसेना आमदारांच्या मनधरणीला यश आलं. अखेर एकनाथ शिंदे यांनी नव्या सरकारमध्ये उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. या शपथविधी सोहळ्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासोबत इतर केंद्रीय मंत्री उपस्थित आहेत. तब्बल २२ राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी या सोहळ्याला हजेरी लावली.

या कार्यक्रमात संत-महंतांनी देखील हजेरी लावली. त्यांनी महाराष्ट्राच्या या नव्या सरकारला आशीर्वाद दिले. तसेच क्रिकेट, सिनेक्षेत्रापासून पान ४ वर ▶▶







# शपथ घेतल्यानंतर पहिल्या तासातच मंत्रिमंडळ बैठक



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता □ प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. तसेच एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. त्यानंतर तीनही नेते हे मंत्रालयात आले. त्यांनी मंत्रालयातील महापुरूषांच्या प्रतिमांना वंदन केले. शपथविधी झाल्यानंतर पहिल्या तासातच महायुती सरकारची पहिली मंत्रिमंडळ बैठक मंत्रालयात झाली. शपथविधीनंतर लगेचच मंत्रिमंडळाची बैठक घेऊन हे सरकार गतिमान असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एकप्रकारे दाखवून दिले आहे.

दरम्यान ७ डिसेंबर रोजी विधीमंडळाचे विशेष अधिवेशन होणार असल्याचीही माहिती समोर येत आहे. नवनिर्वाचित आमदारांना आमदारकीची शपथ देणे गरजेचे आहे. त्यासाठी कदाचित हे विशेष अधिवेशन घेतले गेल्याची शक्यता वर्तविली जात आहे. देवेंद्र फडणवीसांची पहिली स्वाक्षरी वैद्यकीय मदतीच्या फाईलवर मुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या पहिल्याच मंत्रिमंडळ बैठकी पूर्वी पान ४ वर ▶▶



## उद्यापासून विधिमंडळाचे तीन दिवसीय विशेष अधिवेशन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता □ प्रतिनिधी**

**मुंबई :** विधिमंडळाचे तीन दिवसीय अधिवेशन ७ डिसेंबरपासून सुरू होणार आहे. या अधिवेशनात विधानसभा अध्यक्षांची निवड होणार आहे. तर ९ डिसेंबरला बहुमत चाचणी घेण्यात येणार आहेत. अधिवेशनात राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन हे विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहाला संबोधित करणार आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांनी गुरुवारी सांगितले, ' १५ व्या विधानसभेचो नवनिर्वाचित २८८ सदस्य ७ आणि ८ डिसेंबर रोजी शपथ घेणार आहेत.

९ डिसेंबर रोजी राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन संयुक्त अधिवेशनाला संबोधित करणार आहेत.तसेच विधानसभा अध्यक्षपदाची निवडणूक होणार आहे. त्याचदिवशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारची बहुमत चाचणी होणार आहे. पुढे पवार म्हणाले, 'अधिवेशनादरम्यान राष्ट्रवादीच्या नेत्यांची भेट घेणार आहे. त्यानंतर मंत्रिमंडळातील जागावाटपाबाबत चर्चा करणार आहोत.

राष्ट्रवादीचे गटनेते अजित पवार म्हणाले, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांना आदरांजली वाहण्यासाठी दादर येथील चैत्यभूमीला भेट देणार आहोत. राज्य सरकारनं ६ डिसेंबर रोजी मुंबईत सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे. त्यामुळे मुंबई शहर आणि मुंबई उपनगर जिल्ह्यातील सर्व सरकारी कार्यालये शुक्रवारी बंद राहणार आहेत. तसेच दारूची दुकाने बंद राहणार आहेत'. पान ४ वर ▶▶



## मंत्रिमंडळाचा विस्तार कधी?

मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी शपथ घेतली असली तरी विधानसभा अध्यक्ष आणि मंत्रिमंडळाचा विस्तार बाकी आहे. याबद्दल फडणवीस यांना विचारले असता ते म्हणाले, मुंबईच्या विशेष अधिवेशनातच विधानसभा अध्यक्षांची निवड केली जाईल. तसेच ही निवड झाल्यानंतर राज्यपालांचे अभिभाषण व्हावे लागते. त्यामुळे ७, ८ आणि ९ डिसेंबर रोजी आमदारांचे शपथविधी होतील. ९ डिसेंबर रोजी विधानसभा अध्यक्षांची निवडणूक होईल आणि ९ तारखेलाच राज्यपालांनी अभिभाषण करावे, असे निवेदन मंत्रिमंडळाने राज्यपालांना पाठवले असल्याचे देवेंद्र फडणवीस म्हणाले.तसेच नागपूरच्या हिवाळी अधिवेशनापूर्वी मंत्रिमंडळाचा विस्तार होईल, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले.

# फार्माकॉलॉजी-१ चा पेपर फुटला

## विद्यापीठ प्रशासनाकडून फेर परीक्षेचा निर्णय ?

**खबरदारी म्हणून ऐन वेळी बदलला फार्माकॉलॉजी-२ चा पेपर**

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई :** सध्या राज्यात ६२ वैद्यकीय महाविद्यालयात एमबीबीएसच्या द्वितीय वर्षाच्या परीक्षा सुरू आहेत. सोमवारी फार्माकॉलॉजी-१ या विषयाचा पेपर झाला. मात्र, तो फुटल्याची खातरजमा होताच ही परीक्षा पुन्हा घेण्याचा निर्णय विद्यापीठ प्रशासनाने घेतला. याची चौकशी सुरू असताना बुधवारी फार्माकॉलॉजी-२ हा पेपर फुटला असल्याची माहिती मिळाली. मात्र, ती अफवा असल्याचे समजले. तरी दक्षतेचा भाग म्हणून विद्यापीठाने सर्व वैद्यकीय महाविद्यालयांना दुपारी दोन वाजता सुरू होणारा पेपर ३ वाजता घेण्याच्या सूचना देत नवी प्रश्नपत्रिका ई-मेलवर पाठवून ती देण्याची सूचना केली. विद्यार्थ्यांनी सोमवारी फार्माकॉलॉजी-१ विषयाचा पेपर दिला. मात्र, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाला हा पेपर फुटल्याची माहिती मिळाल्याने त्यांनी तत्काळ या प्रकरणाची प्राथमिक माहिती घेतली. पेपर फुटल्याचे स्पष्ट झाल्याने हा पेपर १९ डिसेंबरला पुन्हा घेण्याचा निर्णय घेतला. या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात येत असून, राज्यातील सर्व परीक्षा केंद्राचे व्हिडीओ फुटेज विद्यापीठाने मागविले आहे.

विद्यार्थ्यांना मनस्ताप महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या अखत्यारित ६२ वैद्यकीय महाविद्यालये येतात. त्यामध्ये सुमारे ५८०० विद्यार्थी या परीक्षेला बसले आहेत. सोमवारी पेपरफुटीचा प्रकार घडल्यानंतर तो पेपर पुन्हा विद्यापीठाला घ्यावा लागणार आहे. या अशा घटनांमुळे गुणवंत विद्यार्थ्यांना नाहक मनस्ताप सहन करावा लागतो.

### तीन ठिकाणी पोलिस ठाण्यात तक्रार

स्थानिक म्हसरूळ पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. याशिवाय सायबर सेल शाखेत तक्रार दाखल करून या प्रकरणाच्या ऑनलाइन प्रवासाची तपासणी केली जाते आहे. तसेच गुन्हे शाखेतही या प्रकरणी तपास सुरू झाला आहे. - डॉ. संदीप कडू, परीक्षा नियंत्रक सोमवारी फुटलेला पेपर पुन्हा घेण्यात येणार आहे. त्या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात येत आहे. बुधवारीसुद्धा पेपर फुटल्याची माहिती समाजमाध्यमांवर फिरवली जात होती. मात्र, पेपर फुटला ही केवळ अफवा होती. मात्र, दक्षता म्हणून आम्ही दुपारी दोनचा पेपर तीनला सुरू करण्याच्या सूचना देऊन नवी प्रश्नपत्रिका सर्व परीक्षा केंद्रांना पाठविली.



# विरार, कल्याण, ठाण्यात म्हाडाची १४ हजार घरे प्रतिसादाविना पडून

## प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य

**म्हाडाची नवी योजना**

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

ठाणे : म्हाडाच्या कोकण मंडळातर्फे प्रधानमंत्री आवास योजनेत जाहीर करण्यात आलेल्या विरार, कल्याण आणि ठाण्यातील अल्प उत्पन्न गटातील घरांना सोडतीत प्रतिसाद न मिळाल्याने आता ही घरे प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य तत्वावर दिली जाणार आहेत. त्यासाठी म्हाडाच्या कोकण मंडळाकडून मोहिम राबवली जाणार असून विविध ठिकाणी २९ स्टॉलच्या माध्यमातून या घरांविषयी माहिती दिली जाणार आहे. २ डिसेंबर ते ११ डिसेंबर काळात यासाठी अर्ज करता येणार आहे. विरार येथील बोळींज, कल्याण तालुक्यातील खोणी आणि शिरढोण, ठाणे तालुक्यातील गोठेघर आणि भंडार्ली येथे १४ हजार ०४७ घरे उपलब्ध आहेत.

म्हाडा कोकण मंडळातर्फे पंतप्रधान आवास योजनेच्या माध्यमातून अनेक घरे बांधून तयार आहेत. अल्प उत्पन्न गटातील या घरांसाठी १२ ऑक्टोबर २०२४ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. मात्र पान ४ वर ▶▶

## उल्हासनगर मनपाच्या ताफ्यात

# पाच वातानुकूलित बस दाखल



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

तब्बल १० वर्षापासून ठप्प पडलेली उल्हासनगर महानगरपालिकेची परिवहन सेवा मार्च २०२४ पासून १० नॉन-ए.सी बसेसने सुरवात झाली आहे. आता आयुक्त विकास ढाकणे, अतिरिक्त आयुक्त किशोर गवस यांच्या मार्गदर्शनाखाली पालिका परिवहन सेवेच्या ताफ्यात ५ ए.सी बसेसची एन्ट्री झाली असून त्याचा लाभ उल्हासनगरातील पान ४ वर ▶▶

## मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगेंच्या हस्ते

# बदलापूर आरोग्य केंद्रात 'सीवाय टिबी टेस्ट'चे उद्घाटन



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

दि. ५ डिसेंबर, प्राथमिक आरोग्य केंद्र बदलापूर येथे राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम अंतर्गत दि. ४ डिसेंबर, २०२४ रोजी सुप्त अवस्थेतील क्षयरोगाचे लवकरात लवकर निदान होण्यासाठी सीवाय टिबी (CY TB) टेस्ट या मोहिमेचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. या चाचणी मुळे जास्तीत जास्त संशयित क्षयरुग्णांचे खात्रीपूर्वक निदान करून क्षयरोगातून पूर्ण बरे करण्यास मदत मिळणार आहे अशी माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांनी दिली.

यावेळी जिल्हा माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. स्वाती पाटील, जिल्हा समाज कल्याण अधिकारी उज्वला सपकाळे, जिल्हा क्षयरोग वैद्यकीय अधिकारी डॉ. तरुलता धानके, डॉ. अर्चना मोहिते, तालुका आरोग्य अधिकारी पंचायत समिती अंबरनाथ डॉ. प्रशांत कनोजा, वैद्यकीय अधिकारी प्रा. आ. केंद्र बदलापूर डॉ. अश्विनी वाणे, वैद्यकीय अधिकारी प्रा. आ. केंद्र बदलापूर डॉ. केतकी गायकवाड तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. आशा स्वयंसेविका नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र बदलापूर संजीवनी पाटील यांनी रेखाटलेली आरोग्य शिक्षणपर रांगोळी कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले.


जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित

सौ.कमलताई किसन कथोरे कॉलेज, म्हसा मुंबई विद्यापीठाशी संलग्न

ADMISSION OPEN 2024-25

११ वी व १२ वी

ARTS, COMMERCE, SCIENCE

UNDER GRADUATE: B.A. | B.Com. | B.Sc. CHEMISTRY | B.Sc. MATHS | BAF | BMS

POST GRADUATE: M.Sc. CHEMISTRY | M.Com. ADVANCED ACCOUNTANCY | M.A. MARATHI | M.A. ECONOMICS | M.A. SOCIOLOGY | M.A. HISTORY

Look forward to a BRIGHTER FUTURE

7719814142

9130580111

# दि इंडियन इन्स्टिटयूट ऑफ आर्किटेक्टस संस्थेचा ३५ वा वर्धापन दिन साजरा



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/डोंबिवली(प्रतिनिधी) :**
दि इंडियन इन्स्टिटयूट ऑफ आर्किटेक्टस संस्थेच्या कल्याण डोंबिवली केंद्राची स्थापना ११ नोव्हेंबर १९९० साली झाली होती.यावर्षी केंद्राचा पस्तीसावा वर्धापन दिन शनिवारी ३० नोव्हेंबर २०२४ रोजी डोंबिवली जिमखाना येथे साजरा केला गेला.

ह्या कार्यक्रमाला शीर्षक 'आविष्कार - मागोवा वाटचालींचा वेध भविष्याचा' हे देण्यात आले होते. कार्यक्रमाला सुरुवात करण्याआधी माजी अध्यक्ष श्री. शरद जोगळेकर व सभासद श्री. हेमकांत भिसे ह्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. अध्यक्ष श्री. केशव चिकोडी ह्यांनी त्यांच्या मनोगतामध्ये असे सांगितले कि, कुठलीही संस्था एका रात्रीमध्ये उभी राहत नाही व कोण्या एका माणसामुळे पण उभी राहू शकत नाही. त्याच्यासाठी अनेक सभासदांना वर्षानुवर्षे सातत्याने काम करावे लागते, तेव्हा कुठे संस्था नावारूपाला येते. त्यांनी मागील वर्षातील संस्थेचा नव वर्ष स्वागत यात्रेमधील सहभाग, शिक्षक दिनानिमित्त वेगवेगळ्या वास्तुकला महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे, कल्याण, डोंबिवली व बदलापूर मधील शाळांमध्ये चित्रकला स्पर्धेचे आयोजन अशा प्रकारच्या सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या अनेक उपक्रमांचा आढावा घेतला. तसेच तरुण सभासदांनी केलेल्या कामाचे त्यांनी कौतुक केले व संस्थेच्या पुढील वाटचालीमध्ये सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले.

श्रीमती धनश्री भोसले ह्यांनी मागील वर्षामध्ये संस्थेने जोडलेल्या नवीन सभादांचा व संस्थेच्या 'फेलो मेंबर्स' चा आढावा घेतला आणि संस्थेचे सभासद नसलेल्या व्यक्तींना सभासद होण्याविषयी आव्हान केले.

संस्थेचे कोषाध्यक्ष विनायक पाटणेकर ह्यांनी संस्थेला आर्थिक सहकार्य करण्याविषयी सर्व सभासदांना आव्हान केले. केंद्राचे सचिव श्री. उदय सातावळेकर ह्यांनी आतापर्यंत होऊन गेलेल्या माजी अध्यक्ष आणि त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कामांची सर्वांना ओळख करून दिली व ह्या कार्यक्रमाला उपस्थित असलेले आजी- माजी पदाधिकाऱ्यांचा संस्थेच्या वतीने गौरव करण्यात आला.

संस्थेच्या कार्यकारिणी समितीचे सभासद श्री. संदीप पाटील ह्यांनी 'रेरा स्कॅम' उघडकीस आणला व त्यांनी दाखल केलेल्या जनहित याचिकेवर उच्च न्यायाल याने १९ नोव्हेंबर, २०२४ रोजी त्यांच्या बाजूने निकाल जाहीर केला. ह्या निकालामुळे सर्व सामान्य जनतेला स्थावर मालमत्ता खरेदी करताना होणाऱ्या फसवणूकीवर चांगलाच आळा बसणार आहे. त्यांच्या ह्या लढ्याची संस्थेने दखल घेतली व त्याबद्दल त्यांचा शाल, श्रीफळ व मानचिन्ह देऊन सत्कार केला.

ह्या कार्यक्रमाला अग्निशमन कंत्राटदार निशान इंटरप्रायझेस व बांधकाम कंत्राटदार गायत्री कंस्ट्रक्शन ह्यांचे सहकार्य लाभले. ह्या नंतर झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये विविध सभासदांनी आपल्यातील सुप्त कलागुणांचे दर्शन घडवले.

# महामानव परिचय




**श्रीमती छाया शिंदे**
**जिल्हा परिषद शाळा चिरड**
**तालुका : अंबरनाथ**
**जिल्हा: ठाणे.**

**जन्म १४ एप्रिल १८९१ महू मध्य प्रदेश**
**मृत्यू ६ डिसेंबर १९५६ वय ६५ दिल्ली**
**शिक्षण एम ए पीएचडी डी एस सी एच एल डी डिलीट बॅरिस्टर लॉ**
**विद्यापीठ : मुंबई विद्यापीठ कोलंबिया विद्यापीठ लंडन विद्यापीठ लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमी**
**संस्था : समता सैनिक दल,स्वतंत्र लेबर पार्टी अनुसूचित जाती फेडरेशन भारत बौद्ध सोसायटी**
**उपाधी: स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री , संविधान मसुदा समितीचे अध्यक्ष**
**राजनैतिक पार्टी : भारतीय रिपब्लिकन पार्टी**
**जन्म बालपण शिक्षण : बाबासाहेबांचा जन्म ब्रिटिश केंद्रशासित असलेल्या महू या गावी झाला.**

बाबासाहेबांचे वडील रामजी मालोजी सकपाळ हे ईस्ट इंडिया कंपनीमध्ये सेवेत कार्यरत होते. त्यांनी आपल्या मुलांना शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहित केले.

रामजी १८९८ मध्ये मुंबईमध्ये स्थलांतरित झाले. मुंबईमध्ये बाबासाहेब एलफिस्टन रोडवरील गव्हर्मेंट हायस्कूलमध्ये शिकू लागले. शिक्षणामध्ये उत्कृष्ट कामगिरी करून देखील आपल्याला मिळणाऱ्या स्पृश्य अस्पृश्य वागणुकीमुळे ते व्यतीत होत असत.

१९०७ मध्ये बाबासाहेब मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाले. आणि त्यांनी मुंबई विद्यापीठामध्ये कॉलेजला प्रवेश घेतला. अशा प्रकारे प्रवेश मिळवणारे ते पहिले अस्पृश्य भारतीय होते. सन १९१२ मध्ये बाबासाहेब यांनी राजकारण विज्ञान आणि अर्थशास्त्र मध्ये पदवी मिळवली. व बडोदा राज्य सरकारची नोकरी स्वीकारली. पण लवकरात यांना मुंबईला परत यावे लागले. कारण त्यांच्या वडिलांचा मृत्यू दोन फेब्रुवारी १९१३ ला झाला.

**परदेशातील शिक्षण आणि लिखाण :** गायकवाड शासनाने बाबासाहेबांना प्रतिमा ११.५ डॉलर स्कॉलरशिप प्रदान केली. ज्यामुळे बाबासाहेबांना न्यूयॉर्क येथे जाऊन १९१६ मध्ये पीएचडी पूर्ण करता आली. पीएचडी शिक्षण अंतर्गत त्यांनी केलेल्या संशोधनावर त्यांनी एक पुस्तक प्रकाशित केले.evolution of provential फायनान्स इन ब्रिटिश इंडिया. आपली डायरेक्टली पदवी घेऊन बाबासाहेब लंडन स्कूल ऑफ इकॉनोमिक येथे प्रवेश मिळवला. स्कॉलरशिप बंद झाल्यामुळे बाबासाहेबांना लंडनमधील शिक्षण अर्धवट सोडून भारतात यावे लागले. भारतात येऊन ते पुन्हा बडोदा येथे काम करू लागले.

परंतु कामांमध्ये जातिवाद भेदभाव अनुभवाला आल्यामुळे त्यांनी ती नोकरी सोडून स्वतंत्र व्यवसाय सुरू केला. पण तो फारसा चालला नाही. पुढे त्यांच्या ओळखीच्या राज्यपाल लॉर्ड सिडणेमुळे त्यांना सीडनेम कॉलेज ऑफ कॉमर्समध्ये इकॉनॉमिक्स मध्ये प्रोफेसर ची नोकरी मिळाली. याच दरम्यान कोल्हापूर संस्थांचे राजा शहाजी राजेंमुळे ते पुन्हा लंडनला जाऊ शकले.

लंडनमध्ये १९२३ मध्ये त्यांनी आपले संशोधन प्रॉब्लेम्स ऑफ द रुपी पूर्ण केले. त्यांना लंडन विद्यापीठाद्वारे डॉक्टर ऑफ सायन्स ही उपाधी प्रदान करण्यात आली.

**जातिवाद विरुद्ध आवाज :** सन १९१९ मध्ये डॉक्टर आंबेडकर यांना भारत सरकार अधिनियम मधील साउथ बोरव समितीमध्ये प्रमुख विद्वान म्हणून आमंत्रित केले गेले. जिथे बाबासाहेबांनी दलित आणि अन्य धार्मिक समुदाय समुदाय यांना पृथक निर्वाचिक आणि आरक्षण देण्याची वकालात केली. त्यांनी बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना केली. ज्याद्वारे दलित वर्गात शिक्षण आणि आर्थिक व्यवसाय यांचा प्रसार केला. १९२७ मध्ये बाबासाहेबांनी जातीवादाविरुद्ध व्यापक आंदोलन सुरू केले. याच दरम्यान त्यांनी महाड येथे पाण्याच्या मूलभूत अधिकारासाठी मोठे आंदोलन केले.

आंबेडकरांना त्यांच्या अस्पृश्य समाजातील लोकप्रियतेमुळे लंडनमधील दुसऱ्या गोलमेज परिषदेमध्ये ब्रिटिशांनी आमंत्रित केले. या ठिकाणी त्यांना आश्रुषांना पृथक निर्वाचिका देण्याची घोषणा केली. ज्या विरुद्ध गांधीजींनी आमरण उपोषण केले.

गांधीजींच्या उपोषणामुळे आणि इतर दबावामुळे बाबासाहेबांनी वृत्ताक निर्वाचिका मागणी मागे घेतली. त्यामुळे बाबासाहेबांच्या इतर मागण्या जशा मंदिरामध्ये प्रवेश कृषी अस्पृश्य भेदभाव बंद करण्याच्या मागण्या मान्य करण्यात आल्या. निवडणुका लढवण्याचे आणि मतदानाचे आरक्षण लागू झाले.

**संविधान निर्मिती :** आपल्या अस्पृश्य लोकांच्या लढायच्या विवास्पद आणि गांधी विरोधी प्रतिमा असून सुद्धा स्वतंत्र भारताच्या पहिल्या सरकारने बाबासाहेबांना तंत्र भारताचे पहिले कायदामंत्री होऊन निवडले. २९ ऑगस्ट १९४७ मध्ये भारताच्या संविधान निर्मिती समितीचे त्यांना अध्यक्ष बनवण्यात आले. बाबासाहेबांनी बनवलेल्या संविधानातील काही महत्त्वाच्या मुद्द्यांचे हिंदीमधील अनुवाद खालील प्रमाणे आहे. संविधान पाठ मे संविधानिक गारंटी के साथ व्यक्तिगत नागरिकों को एक व्यापक श्रेणी की नागरिक स्वतंत्रता की सुरक्षा प्रधान की । जीन मे धार्मिक तंत्रता अस्पृश्यता का अंत और सभी प्रकार के भेदभावो का गैर कानूनी करार दिया गया ।


बाबासाहब ने महिलाओ के व्यापक आर्थिक और सामाजिक अधिकारो की वकालत की ।

अशाप्रकारे २६ नोव्हेंबर १९४९ ला संविधान सभेने बाबासाहेब यांनी बनवलेले संविधान अंगीकारले.

**बौद्ध धर्म स्वीकार :** १९५० मध्ये बौद्ध धर्म प्रती आकर्षणामुळे बाबासाहेब श्रीलंकेला बौद्ध भिक्षु आणि विद्वान यांच्या संमेलनाला हजर झाले. पुण्याला एक नवीन बौद्ध विहार ची स्थापना करून बौद्ध धर्मावर आपण पुस्तक लिहीत असल्याची त्यांनी घोषणा केली. व पुस्तक प्रकाशित झाल्यानंतर आपण बौद्ध धर्म स्वीकारण्याची त्यांनी घोषणा केली. १९५६ मध्ये त्यांनी बुद्ध अँड हीच धम्म हा ग्रंथ लिहून पूर्ण केला. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी आंबेडकरांना नागपूर येथे एका बौद्धिक भिक्षु कडून पारंपारिक पद्धतीने तीन रत्न ग्रहण आणि पंचशीलंगी कारण बौद्ध धर्माचा स्वीकार केला.

**महापरिनिर्वाण :** १९४८ मध्ये बाबासाहेबांना मधुमेह झाला. जून ते ऑक्टोबर १९५४ या दरम्यान ते खूपच अशक्त झाले. ६ डिसेंबर १९५६ रोजी खालावलेल्या तब्येतीमुळे महामानव परमपूज्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे निधन झाले.

## बंदी घातलेल्या गुटख्याच्या गोदामावर पोलिस उपायुक्तांच्या पथकाने टाकला छापा



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :**
कल्याणच्या महात्मा फुले पोलीस ठाण्याच्या हद्दीत बंदी असलेल्या गुटख्याच्या गोदामावर पोलिस उपायुक्तांच्या पथकाने छापा टाकून सात लाखांचा गुटखा जप्त केला आहे. या प्रकरणी तीन गुटखा माफियांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिस उपायुक्तांच्या पथकाने घटनास्थळावरून जहांगीर शेख नावाच्या आरोपीला अटक केली आहे. तर मुनावर खान आणि जीशान खान फरार असल्याचे सांगण्यात येत आहे. कल्याणचे सहाय्यक पोलिस आयुक्त कल्याणजी घेटे यांनी सांगितले की, परिमंडळ-३ चे पोलिस उपायुक्त अतुल झेंडे यांच्या पथकाला बंदी असलेल्या गुटख्याबाबत गुप्त माहिती मिळाली होती. याच माहितीच्या आधारे पोलिस उपायुक्त पथकाने महात्मा फुले पोलिस ठाण्याच्या हद्दीत छापा टाकून ६ लाख ६८ हजार ५७० रुपयांचा गुटखा जप्त केला. सहाय्यक पोलिस आयुक्त कल्याणजी घेटे यांनी दिलेल्या माहितीनुसार, जप्त केलेल्या गुटख्यांमध्ये दहा वेगवेगळ्या प्रकारच्या गुटख्यांचा समावेश आहे.

पोलिस उपायुक्त पथकाने टाकलेल्या छाप्यानंतर कल्याणच्या गुटखा माफियांमध्ये घबराट पसरली आहे. हे गुटखा माफिया भिवंडीतून मोठ्या प्रमाणावर गुटखा आणतात, आणि कल्याण स्टेशनसह संपूर्ण शहरात पुरवठा करतात, असे सांगितले जाते. टाकलेल्या या छाप्यानंतर गुटखा माफियांमध्ये घबराट पसरली असून, अटकेच्या भीतीने ते शहरातून पळून गेले आहेत.

## तेथे कर माझे जुळती

# क्रांतीसिंह नाना पाटील





वीर भाई कोतवाल याप्रमाणे नाना पाटील यांनी इंग्रजांच्या जुलमी राजवटीला आव्हान देणारे प्रतिसरकार निर्माण केले. अशा नाना रामचंद्र पिसाळ उर्फ नाना पाटील यांचा जन्म ३ ऑगस्ट १९०० रोजी सांगली जिल्ह्यातील येडे मच्छिंद्र या गावात झाला. त्यांचे वडील रामचंद्र गावचे पाटील होते. नानांनी आपल्या गावात प्राथमिक शिक्षण पूर्ण केले. १९१६ साली ते इयत्ता सातवी ची परीक्षा उत्तीर्ण झाले .

त्या काळची मुलकी परीक्षा नानांनी उत्तीर्ण केली ,आणि ते तेथेच तलाठी म्हणून काम पाहू लागले.सांगली,सातारा हे शक्तीची उपासना करणारे प्रांत होते. मल्लविद्या व कसरतीचे आखाडे तेथेआजही गावोगावी दिसतात.जाणकार नाना पाटलांनी समाजाचा अभ्यास केला ते सत्यशोधक समाजात सामील झाले.समाज रचना पाहिल्यानंतर त्यांनी सामाजिक सुधारणा करण्याचे व्रत घेतले . हुंडा देण्याची व घेण्याची प्रथा बंद करणे आवश्यक आहे ; असे प्रतिपादन ते भाषणात करीत असत. धर्माच्या नावाखाली अंधश्रद्धा वाढवू नका, असा ते उपदेश करीत. समाजातील स्पृश्य अस्पृश्य ही दरी कमी करण्याचा त्यांनी आटोकाट प्रयत्न केला .त्यामुळे समाज जागृती झाली.

१९३० च्या सविनय कायदे भंगाच्या चळवळीत त्यांनी सहभाग घेतला.ब्रिटिश सरकारला समांतर यंत्रणा उभी करण्यासाठी त्यांनी ग्रामीण भागातील लोकांना जागे केले. सदर चळवळीत यशवंतराव चव्हाण यांसारखे विचारवंत , राजकारणी व सुसंस्कृत नेते कार्यरत होते. नाना पाटील हे गनिमी काव्याने लढणारे ब्रिटिशांना चकवणारे क्रांतिकारक होते.त्यासाठी ते गावोगावी जाऊन फिरून भाषणे देत असत. एकेका आठवड्यात शे-दीडशे सभा घेत. त्या काळी वंदे मातरम् म्हणणे सुद्धा गुन्हा होता. अशा काळात नाना पाटील स्वातंत्र्या बद्दलचे जहाल विचार लोकांसमोर मांडायचे. विशेष म्हणजे घटनास्थळी इंग्रज पोलीस येऊन पोहोचायच्या आधी ते पसार व्हायचे. नानांच्या मनात महात्मा गांधींबद्दल अत्यंत आदराची भावना होती. मात्र इंग्रजांना अहिंसेची भाषा समजत नव्हती. जशास तसे नि ठोशास ठोसे ह्या धोरणाचा अवलंब करणे त्यांना प्रशस्त वाटत असे. त्यांनी १९४२ सालच्या 'भारत छोडो' आंदोलनात भाग घेतला.सातारला प्रतिसरकार स्थापन केले . प्रतिरुरकार म्हणजे ब्रिटिश अधिकाऱ्यांची हकालपट्टी करून तेथे लोकाभिमुख सरकारची स्थापना करणे यालाच समांतर सरकारे स्थापन करणे असे म्हणतात . नानांनी आपल्या संघटनेला 'पत्री सरकार' असे नाव दिले होते. अशा कारवायां मुळे ब्रिटिश सरकार चवताळले .

नानांना पकडण्यासाठी १०,००० रुपयांचे इनाम लावले. पण नाना कोणाच्या हाती आले नाहीत. त्यांची ग्रामराज्याची कल्पनाही वाखाणऱ्या सारखी होती. एकदा राज्य आपल्या हाती आले की प्रत्येक गावात लोकनियुक्त पंचांकडून त्या गावाचा कारभार चालवायचा, न्यायदान करावयाचे त्यानुसार गावात पंचसभा व न्यायदान समित्या त्यांनी कराड ,वाळवे तासगाव इ .गावात स्थापन केल्या.अशाप्रकारे तब्बल दीड हजार गावांमध्ये प्रतिसरकार चालवणारे नाना पाटील मशहूर आहेत. त्यांचे वैशिष्टय असे होते की,ते सरकारी खजिना लुटून गोरगरिबांना वाटत असत .सहकाऱ्यांसह भूमिगत व्हायचे . आणि जंगलात राहून गनिमी काव्याने लढत.१९४६ साली देशाला स्वातंत्र्य देण्याचा विचार झाला आणि काँग्रेस मंत्रिमंडळ अधिकारावर आले. म्हणून नानांचे पकड वॉरंट रद्द करण्यात आले . त्यांनी भूमिगतांचे पकड वॉरंट देखील रद्द करून घेतले. मंत्रिमंडळाने ते मान्य केले .

देशाला स्वातंत्य मिळाल्या नंतर नाना पाटील यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत भाग घेतला. नेते म्हणून ते आयुष्यभर सक्रीय राहिले. १९५७ मध्ये सातारा मतदार संघातून लोकसभा निवडणूकीत नाना खासदार म्हणून निवडून आले होते .त्याचप्रमाणे १९६७ मध्ये ते बीड मतदार संघातून खासदार म्हणून निवडून आले होते. भारतीय संस्कृती शिष्टमंडळाचे अध्यक्ष, गोरगरिबांचे कैवारी नेते ,इंग्रज शासनाला क्रांतीकारी मार्गाने हादरवणारे महाराष्ट्रातील कणखर व्यक्तिमत्त्व दिनांक ६ डिसेबर १९७६ रोजी चिरनिद्रेत लीन झाले !



**डॉ. आनंदराव सूर्यवंशी**

# कोसले येथे श्रमदानातून वनराई बंधारे!



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/शहापूर ग्रामिण(नरेंद्र पाटील) :**
वासिंद जवळील असलेल्या कोसले या गावात कल्याण तालुका कृषी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाने आज श्रमदानातून वनराई बंधारे बांधण्यात आले , यावेळी प्रसाद भोकरे (कृ. स), शेतीनिष्ठ शेतकरी श्रीराम पालवी , प्रगतशील शेतकरी ज्ञानेश्वर चौधरी, सतीश पालवी , बळीराम कोळेकर, कविता पारधी(बचत गट) योगिता पारधी, यांनी श्रमदान करून बांधारा बांधला.

रब्बी पिकासाठी कडधान्य लागवड, भाजीपाला लागवड यासाठी व फळबाग लागवडीसाठी पाऊस संपल्यावर पाण्याची आवश्यकता असते, त्यासाठी पाण्याचे नियोजन गरजेचे आहे,वनराई बंधारा यामध्ये सिमेंट च्या किंवा अन्य मोकळया गोण्याचा वापर करून त्यामध्ये वाळू भरून बंधारा बांधला जातो.

बहुतेक शेतकऱ्यांना ओढा नाला याचा संपर्क असतो. पावसाळा संपल्यावर पाण्याचा प्रवाह कमी झाल्यावर असे वनराई बंधारे शेतकऱ्यांना वरदान ठरतील,मौजे कोसले येथे दरवर्षी श्रमदान करून असे बंधारे बांधले जातात.शेतीनिष्ठ शेतकरी श्रीराम पालवी, प्रगतशील शेतकरी ज्ञानेश्वर चौधरी यांचा यामध्ये सातत्याने पुढाकार असतो.

वनराई बंधारे बांधावे यासाठी तालुका कृषी अधिकारी कल्याण यांच्या माध्यमातून प्रचार, जमजागृती केली जाते. यासाठी ता.कृ.अ. कुमार जाधव ,म. कृ. अ. भगवान पथारे कृ. प विजय पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

# सेवा निवृत्ती म्हणजे आयुष्याची दुसरी इनिंग

**: डॉ. विजय जाधव**




**दै.ठाणे जीवनदिप वार्ता भिवंडी(प्रतिनिधी) :**
सेवा निवृत्ती म्हणजे आयुष्याची दुसरी इनिंग असते. अखंडपणे ज्ञानार्जन करत लाखो विद्यार्थ्यांना यशाच्या शिखरावर पोचवणे हीच शिक्षकांची खरी सेवा निवृत्ती असते. पद्मश्री अण्णासाहेब जाधव यांनी ही संस्था एक कुटुंब आहे ही संस्कृती रुजवली ती प्रत्येकांच्या मनात आपोआप घर करुन जाते. समाजाच्या जडणघडणीत शिक्षकांचे स्थान खुप मोठे आहे. त्यांनी अविरतपणे ज्ञानदानाचे कार्य केले पाहिजे असे मत पद्मश्री अण्णासाहेब जाधव भारतीय समाज उन्नती मंडळाचे बी. एन. एन. महाविद्यालयाचे संस्थाध्यक्ष डॉ. विजय जाधव यांनी व्यक्त केले.

महाविद्यालयातील कर्मयोगी डॉ. चंद्रकांत पाटील, डॉ. रईस रजबकर, प्रा. गुणवंत बेल खेडे, प्रा. उमाकांत वसइकर, ग्रंथपाल संगिता प्रधान यांच्या सेवा निवृत्तीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी समाज सेवक डॉ. सोन्या पाटील, सरचिटणीस आर एन पिंजारी, प्राचार्य डॉ. अशोक वाघ, उपप्राचार्य डॉ. सुधिर निकम, डॉ. सुरेश भदरगे, डॉ. निनाद जाधव, डॉ. सुवर्णा रावळ, डि. एल. अहिरे, प्रबंधक नरेश सिरसाळे सह महाविद्यालया तील सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मयोगी व सेवानिवृत्त प्राध्यापक उपस्थित होते.कार्याध्यक्ष बाळकृष्ण काळे व प्राचार्य डॉ. अशोक वाघ यांनी सर्व सेवा निवृत्त कर्मयोगींना पुढील आयुष्यासाठी सुभेच्छा दिल्या. या समारंभाचे सूत्रसंचाल न डॉ. बि. टी. पगारे तर आभार प्रा. संजय सोनवणे यांनी मानले.




**०६ डिसेंबर २०२४**
**शुक्रवार**

**मेष**
तुम्ही काही शुभ कार्यक्रमात उत्साहाने सहभागी व्हाल. धार्मिक कार्यात श्रद्धा आणि विश्वासाने पुढे जाल. आजचा दिवस तुमच्यासाठी उत्तम राहील.

**वृषभ**
कामाच्या ठिकाणी तुम्ही अशा व्यक्तीला भेटाल जिच्याशी तुम्हाला चांगले वाटेल. आज तुमची आई तुमची इच्छा पूर्ण करेल.दिवस तुमचा भाग्यशाली असेल.

**मिथुन**
पालकांच्या आशीर्वादाने तुम्हाला तुमच्या कामात यश मिळेल.काही विशेष कामाबाबत कुटुंबात परस्पर चर्चा होईल. तुमच्या निर्णयाला विशेष प्राधान्य मिळेल.

**कर्क**
कुटुंबासोबत एखाद्या धार्मिक स्थळी दर्शनासाठी जाल, कौटुंबिक प्रेम वाढेल. आज शांत चित्ताने कोणतेही काम केल्यास ते लवकरच पूर्ण होईल.

**सिंह**
काही प्रकरणांमध्ये, अधिक कठोर परिश्रम असतील आणि परिणाम कमी फायदेशीर असेल. ऑफिसमध्ये काही नवीन कामही समोर येऊ शकते.

**कन्या**
तुमच्या व्यवसायाच्या मंद गती मुळे तुम्ही चिंतेत असाल.मनात चाललेल्यागोष्टी पालकांशी बोलू शकता. लहान मुलांसाठी भेटवस्तू आणू शकता.

**तूळ**
कौटुंबिक कोणताही निर्णय घेण्यापूर्वी घरातील वडीलधाऱ्यांचे मत अवश्य घ्या. नवीन व्यवसाय सुरू करण्यासाठी व्यावसायिकांसाठी दिवस शुभ आहे.

**वृश्चिक**
नवीन काम अतिशय चांगल्या पद्धतीने करण्याचा प्रयत्न करा. आज तुम्हाला आर्थिक लाभ होण्याची शक्यता आहे. दिवस बदलांनी भरलेला असू शकतो.

**धनु**
तुमच्या गुरूकडून करिअरचा सल्ला घेऊ शकता. दिवस तुमच्यासाठी चांगला जाणार आहे. काम अतिशय काळजीपूर्वक आणि कार्यक्षमतेने कराल.

**मकर**
दिवस तुमच्यासाठी उत्साहाने भरलेला असणार आहे, आज तुम्हाला काही कामात जास्त मेहनत करावी लागेल, तुम्ही जास्त वेळ व्यस्त असाल.

**कुंभ**
तुमच्या जीवनात काही बदल होऊ शकतात जे तुमच्यासाठी चांगले सिद्ध होतील. काही काम पूर्ण करण्यासाठी जास्त मेहनत करावी लागेल.

**मीन**
मुलांची चिंता दूर होईल. मेहनतीचे नजीकच्या भविष्यात उत्कृष्ट फळ मिळणार आहे.कामे वेळेवर पूर्ण न झाल्यामुळे समस्यांना सामोरे जावे लागेल.

# पेंढरकर महाविद्यालय अनधिकृत बांधकाम केल्याचे माहिती अधिकारात उघड

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :**
डोंबिवली शहरातील पेंढरकर महाविद्यालय अनधिकृत बांधकामाचे आगार बनले असून शासनाने शिक्षण देण्यासाठी हा भूखंड दिला असता त्यावर वैयक्तिक फायद्यासाठी कायदा व नियम धाब्यावर बसवून मंडळाने या भूखंडावर शिक्षणाशी संबंध नसलेली बेकायदा बांधकामे उभी केली असल्याचा आरोप समाजसेवक सोनू सुरवसे यांनी केला आहे. सोनू सुरवसे यांना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून माहिती अधिकारात मिळालेल्या माहितीनुसार, डोंबिवली औद्योगिक क्षेत्रातील डोंबिवली शिक्षण प्रसारक मंडळाला मिळालेल्या भूखंडावर व्यावसायिक जिमखाना, लहान मुलांचा सांभाळ करण्यासाठीचे 'मदर टच' हे संगोपन केंद्र, तसेच महाविद्यालयाच्या ग्रंथालयासमोर उभारण्यात आलेले लोखंडी शेड या बांधकामास महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून कोणतीही परवानगी देण्यात आलेली नाही.

दरम्यान, महाराष्ट्र शासनाच्या नियमांना डावलून, शासन निर्णय धाब्यावर बसवून स्वतःच्या मर्जीने महाविद्यालय खाजगी झाले असे घोषित करणाऱ्या व त्याप्रमाणे बेकायदेशीर कृत्य करणाऱ्या या शिक्षण माफियाने शैक्षणिक परिसरात बाजार मांडला आहे. या माफियांच्या दुष्कृत्य बद्दल सेव पेंढरकर मोहिमे अंतर्गत १४ जून २०२४ पासून जन आंदोलन सुरू आहे. लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष, शासनाचे वेळकाढू धोरण यामुळे कायदा धाब्यावर बसवणारे व बेकायदेशीर कृत्य करणारे अध्यक्ष व डोंबिवली शिक्षण प्रसारक मंडळ हे जणू देशातील सर्वोच्च संस्था असल्यासारखे वागत असल्याचा आरोप सुरवसे यांनी केला आहे.

डोंबिवली परिसरात प्रभाकर देसाई यांची मोठी दहशत असून त्यामुळेच महाविद्यालय कोणत्याही निर्णयाशिवाय खाजगी केल्याचे घोषित करूनही त्यांच्यावर अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. आता महाविद्यालय परिसरातील या अनधिकृत बांधकामाविरुद्ध महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ आणि संबंधित शासन यंत्रणा ठोस भूमिका घेऊन योग्य ती कारवाई करतील कि इतरांप्रमाणे डोंबिवली शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रभाकर देसाई यांच्या दहशतीला शरण जातील असा सवाल समाजसेवक सोनू सुरवसे यांनी उपस्थित केला आहे.

# शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसंदर्भात आढावा बैठक संपन्न

## बैठक घेणारा ठाणे जिल्हा राज्यात पहिला

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता ठाणे(प्रतिनिधी) :**
बदलापूर येथील शालेय अल्पवयीन मुलींवर झालेल्या अत्याचाराच्या घटनेनंतर जिल्ह्यातील शाळांनी बालकांच्या संरक्षणासाठी कोणत्या खबरदारी घेतल्या आहेत हे जाणून घेण्यासाठी ठाणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीनिवास ब्रि. अग्रवाल यांच्या आदेशाने व जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव ईश्वर कां. सुर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक घेण्यात आली.

मा. उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करून त्याअन्वये बालकांच्या सुरक्षिततेबाबत नियमावली बनवली असून त्या अनुषंगाने शासन निर्णय पारीत केला आहे.ही नियमावली केवळ कागदावरच राहू नये, त्याची अंमलबजावणी होण्याच्या उद्देशाने न्यायाधीश तथा सचिव ईश्वर सूर्यवंशी, मुख्य न्याय दंडाधिकारी एस. के. फोकमारे, ठाणे जिल्हा महिला बाल कल्याण अधिकारी महेंद्र गायकवाड, पोलीस गुन्हे शाखेचे सहायक आयुक्त राजकुमार डोंगरे, सरकारी वकील संजय मोरे आणि ठाणे जिल्ह्यातील सर्व महानगर पालिका व जिल्हा परिषदेचे शिक्षण अधिकारी, गट शिक्षण अधिकारी, संस्था प्रतिनिधी आणि मुख्याध्यापक संघाचे प्रतिनिधी यांच्यासह आढावा बैठक घेण्यात आली. या विषयाबाबत बैठक घेणारा ठाणे जिल्हा राज्यातील पहिला जिल्हा ठरला आहे.

बालसुधारगृहांमधील बाल आरोपींमध्ये पोस्कोच्या गुन्ह्यातील बालकांची संख्या लक्षणीय आहे. हे चिंताजनक चित्र बदलायचे असेल तर ते शिक्षकच बदलू शकतात. मोबाईलच्या माध्यमातून पॉर्न संस्कृतीत गुंतत चाललेल्या बालकांना तेच यातून बाहेर काढू शकतात, असा विश्वास ठाणे न्यायालयाचे मुख्य न्याय दंडाधिकारी एस.के. फोकमारे यांनी व्यक्त केला.

ज्ञानदानाचे काम करणाऱ्या शैक्षणिक संस्थांमध्ये आता बालकांच्या लैंगिक अत्याचाराच्या वाढत्या घटनांमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असल्याचे गुन्हे शाखेचे सहायक पोलिस आयुक्त राजकुमार डोंगरे यांनी सांगितले.

जिल्हा विधि सेवा प्राधिकरणाचे सचिव न्या. ईश्वर सूर्यवंशी यांनी बैठकीला उपस्थित असलेल्या शिक्षण अधिकारी, प्राथमिक व माध्यमिक गटशिक्षण अधिकाऱ्यांकडून शालेय सुरक्षेचा आढावा घेतला. त्याचबरोबर या आढाव्यात शाळेशी निगडीत सर्व लोकांना कायदे व बालकांच्या हक्कांचे संरक्षण याविषयी प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. तसेच प्रत्येक कर्मचाऱ्याचे पोलीस पडताळणी प्रमाणपत्र असणे अनिवार्य आहे, बालकांच्या संबंधी निवासी व अनिवासी संस्थांमध्ये पोलीस विभागाकडून पर्यवेक्षण होणे आवश्यक आहे, शाळांमध्ये सी.सी.टी.व्ही व त्यांचे एक महिनाभराचे बॅकअप जतन असणे गरजेचे आहे, शालेय स्टाफला व मुलांना सायबर गुन्ह्यांबाबत सावधगिरीचे प्रशिक्षण देण्यात यावे. तसेच शाळांमध्ये पायाभूत सुविधा दिल्या जातात की नाही यावर शासकीय शालेय विभागाचा अंकुश हवा, तसेच प्रत्येक शाळेमध्ये सर्व विद्यार्थ्यांना 'गुड टच, बॅड टच' (Good Touch Bad Touch) बाबत प्रशिक्षण देण्याचे गरजेचे आहे व यासाठी सामाजिक संस्थांची देखील मदत घेण्याचे आवाहन केले. त्याप्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्यांपर्यंत हे प्रशिक्षण पोहोचले की नाही याची खातरजमा करणे गरजेचे आहे, याचबरोबर संबंधित शैक्षणिक विभाग यांनी वारंवार शाळांना भेट देवून शासन निर्णयाची अंमलबजावणी होते किंवा नाही याची पडताळणी करून अहवाल जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडे सादर करण्याचे निर्देश श्री. सुर्यवंशी यांनी यावेळी दिले.

यावेळी ठाणे जिल्हा महिला व बालविकास अधिकारी श्री. गायकवाड यांनी शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत शिक्षक आणि विद्यार्थी या दोन्हींचे प्रशिक्षण शिबिर घेणे अत्यावश्यक असून या विषयासंदर्भात कोणालाही काहीही मदत अथवा मार्गदर्शन हवे असल्यास महिला व बाल विकास विभागाशी संपर्क साधण्याबाबत आवाहन केले.

# एक युगपुरुष डॉ. बाबासाहेब आंबेडकर



सोनियाची उगवली सकाळ, जन्मा आले भीम बाळ..!! सोनियाची ही सकाळ उगवली होती १४ एप्रिल १८९१ रोजी मध्यप्रदेशातील महु या गावी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न ,परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्माने..!

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारताच्या इतिहासातील एक अद्वितीय व्यक्तिमत्त्व होते, ज्यांनी दलित, वंचित आणि शोषित समाजाला मुख्य प्रवाहात आणून सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि आर्थिक क्षेत्रात खूप मोठे परिवर्तन घडवले. डॉ. आंबेडकर हे अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून पुढे आले. त्यांचे वडील रामजी हे पेशाने शिक्षक होते. त्यांनी संत कबीर, महात्मा फुले आणि भगवान गौतम बुद्धाना आपले गुरु मानले. १९०७ मध्ये ते मॅट्रिक पास झाले.त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण मुंबई येथील एल्फिस्टन कॉलेजात झाले. बडोदे सरकार यांनी त्यांना उच्च शिक्षणासाठी अमेरिकेला पाठवले. त्यांनी कोलंबिया विद्यापीठ (अमेरिका) व लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधून उच्च शिक्षण घेतले.

अर्थशास्त्र, कायदा, आणि राज्यशास्त्र या विषयांमध्ये त्यांनी प्राविण्य मिळवले. भारतात परत आल्यावर त्यांनी उदरनिर्वाहासाठी वकिली सुरु केली. परंतु वरिष्ठ न्यायालयात काम करताना त्यांना अस्पृश्य म्हणून वागणूक मिळू लागली.याचा त्यांना खूप त्रास झाला. स्त्रियांचा हक्क, विधवा पुनर्विवाह, स्त्रीशिक्षण या गोष्टीत जोपर्यंत सुधारणा होत नाहीत तोपर्यंत अस्पृश्यता हटवणे अशक्य आहे म्हणून त्यांनी 'मनुस्मृती' या प्राचीन ग्रंथाचे दहन केले. अस्पृश्यांना महाडच्या तळयावर पाणी पिण्यास बंदी होती या न्यायाविरुद्ध त्यांनी 'महाडचे चवदार तळे सत्याग्रह' करून ते तळे दलितांसाठी खुले केले. हे त्यांच्या आयुष्यातील सामाजिक क्रांतीचे मोठे टप्पे ठरले. नाशिकच्या काळाराम मंदिरात प्रवेश नाकारल्यामुळे काळाराम मंदिर सत्याग्रह केला. अस्पृश्यतेविरुद्ध त्यांनी आयुष्यभर लढा दिला. शेतकऱ्यांच्या, कामगारांच्या हितासाठी संघर्ष केला. त्यांनी जातिव्यवस्थेवर कठोर टीका करत समानतेचा संदेश दिला. समता आणि बंधुभावासाठी अविश्रांत कार्य केले.

हक्क मागून मिळत नसतात तर ते मिळवावे लागतात अशी स्फूर्तीदायी, स्वाभिमानाची शिकवण बाबासाहेबांनी पददलितांना दिली. घटना समितीत ते मसुदा समितीचे अध्यक्ष होते. स्वतंत्र भारताचे भारताचे पहिले कायदा मंत्री म्हणून त्यांनी भारताच्या संविधानाचा मसुदा तयार केला. भारतीय संविधानाने प्रत्येकाला समान अधिकार देऊन देशात लोकशाही मूल्यांची रुजवात केली आहे. म्हणूनच त्यांना 'भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार' म्हणून गौरविण्यात येते.डॉ. आंबेडकर यांनी कृषी, कामगार आणि उद्योग सुधारणा यासाठी महत्त्वपूर्ण उपाय सांगितले, तसेच जलव्यवस्थापन, विशेषतः दामोदर, महानदी व इतर नद्यांचे जलप्रकल्प सुचवले.

'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा संदेश त्यांनी दिला. त्यांनी मूकनायक,समता, बहिष्कृत भारत, जनता, प्रबुद्ध भारत या वृत्तपत्रांचे ते संपादक होते. त्यांनी 'हु वेअर द शुद्राजः हिंदू कोड बिल ', 'पोझिशन ऑफ दि वूमन इन हिंदूझम अँड बुद्धिझम', ' बुद्ध अँड हिज धम्मा', 'प्रोब्लेम ऑफ द रुपी', थॉटस ऑन पाकिस्तान',' पार्लमेंटरी डेमोक्रॅसी' इत्यादी पुस्तके लिहिली. त्यांनी स्वताची अशी विचारसरणी मांडली आणि स्वतःच्या बुद्धीला पटेल असेच वागले..

पिढ्यांनुपिढ्यांच्या, जीर्ण रुढींच्या श्रृंखलांना तोडिले.. बुद्धाविना नाही कुणा हात भीमाने जोडिले...!

सामाजिक विषमतेला विरोध म्हणून दि. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी त्यांनी भदन्त चंद्रमणी यांच्याकडून बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. त्यांनी लाखो अनुयायांसह जो समता व मानवतेचे प्रतीक आहे असा बौद्ध धर्म स्वीकारला, बौद्ध धर्माचा प्रचार केला, काही काळ बौद्ध धर्माच्या छायेत घालवला. डॉ. आंबेडकर यांची सत्यशोधक वृत्ती, प्रगल्भ विचारसरणी, लोकशाही मूल्यांवरील विश्वास, मानवतावादी दृष्टिकोन वैशिष्ट्ये आपण आचरणात आणायला हवीत.

डॉ. आंबेडकर हे भारतीय संविधानाचे शिल्पकार, समाजातील वंचित घटकांना न्याय मिळवून देणारे नेतृत्व, अस्पृश्य समाजाला आत्मसन्मानाची जाणीव देणारे महानायक, आधुनिक भारतातील समतेचे प्रतीक आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ दलित समाजासाठीच नव्हे, तर संपूर्ण भारतासाठी प्रेरणास्थान आहेत. त्यांनी सामाजिक न्याय, समता आणि लोकशाही मूल्यांची ज्योत प्रज्वलित केली, जी आजही आपल्यासाठी मार्गदर्शक आहे. त्यांचे विचार आणि कार्य पुढील अनेक पिढ्यांसाठी दिशादर्शक ठरतील. म्हणूनच, डॉ. आंबेडकर यांना युगपुरुष म्हणून ओळखले जाते. अशा हा युगपुरुष ६ डिसेंबर १९५६ रोजी अनंतात विलीन झाला. त्यांच्या या महापरीनिर्वान दिनानिमित्त माझे शतशः नमन ....!

**सौ. चंदाराणी माधव कुसेकर**
**महाराष्ट्र शासन राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षिका**
**ठाणे जिल्हा परिषद शाळा माणेरे ता. अंबरनाथ**

# महिलांसह पुरुषांचीही 'गुलाबी'ला पसंती

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता मुंबई(प्रतिनिधी) :**
व्हॉयलेट फ्लेम मोशन पिक्चर्स प्रस्तुत आणि अभ्यंग कुवळेकर दिग्दर्शित 'गुलाबी' या चित्रपटाने प्रेक्षकांच्या मनात एक वेगळे स्थान निर्माण केले आहे. सोनाली शिवणीकर, शीतल शानभाग, अभ्यंग कुवळेकर, आणि स्वप्नील भामरे यांची निर्मिती असलेल्या या चित्रपटाला प्रेक्षकांचा भरभरून प्रतिसाद मिळत असून समीक्षकांकडूनही या चित्रपटाची प्रशंसा झाली आहे.




तीन मैत्रिणींची ही कथा आहे जी, स्वत्वाचा शोध घेणारी आहे. ही कथा प्रेक्षकांना भावनिक स्तरावर जोडणारी आहे. फक्त महिलाच नव्हे तर पुरुष प्रेक्षकांनाही हा चित्रपट आपलासा वाटतोय. हे 'गुलाबी'च्या यशाचे विशेष वैशिष्ट्य आहे असे म्हणण्यास काहीच हरकत नाही!.चित्रपटाने मैत्रीतील खूप नाजूक नात्यांना सुरेखपणे रंगवले आहे. नातेसंबंध, स्वप्नांच्या पूर्ततेसाठी दिलेली झुंज आणि स्वतःच्या अस्तित्वाचा शोध घेताना येणाऱ्या अडथळयांना एक संवेदनशील दृष्टीकोन दिला गेला आहे. 'गुलाबी'मध्ये अश्विनी भावे, मृणाल कुलकर्णी आणि श्रृती मराठे यांच्या प्रमुख भूमिका आहेत.

दिग्दर्शक अभ्यंग कुवळेकर म्हणतात, "'गुलाबी' हा केवळ चित्रपट नसून तो एक अनुभव आहे जो आपण सर्वांनी आपल्या जीवनात कुठेतरी अनुभवलेला आहे. हा चित्रपट केवळ मनोरंजन देत नाही, तर प्रेक्षकांना विचार करण्यास प्रवृत्त करतो. आम्हाला केवळ महिलाच नाही तर पुरुष प्रेक्षकांकडून देखील प्रचंड चांगला प्रतिसाद मिळाला आहे.'

## अपंग विकास महासंघाच्या वतीने

# जागतिक अपंग दिन साजरा

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :**
३ डिसेंबर हा सर्वत्र जागतिक अपंग दिन म्हणून साजरा केला जातो. त्या प्रमाणे अपंग विकास महासंघ महाराष्ट्र कल्याण यांच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन कल्याण येथे करण्यात आले होते.



अपंग विकास महासंघाचे कल्याण आधारवाडी येथील कार्यालयापासून दिव्यांग बांधवांनी रॅली काढली. लालचौकी, सहजानंद चौक, शिवाजी चौक ते महापालिका मुख्यालय पर्यन्त आली. तेथे महापालिकेचे समाज कल्याण अधिकारी प्रशांत गव्हाणकर यांनी स्वागत केले. त्या नंतर अत्रे कॉन्फरन्स हॉल येथे पंचायत समिती कल्याण, अपंग विकास महासंघ व कल्याण डोंबिवली महापालिकेच्या सहकार्याने दहावी व बारावीच्या दिव्यांग गुणवंत विद्यार्थी तसेच खेळात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या दिव्यांग खेळाडुंचा सन्मान करण्यात आला.

यावेळी महापालिका आयुक्त डॉ इंदुराणी जाखड यांनी जागतिक अपंग दिनाच्या शुभेच्छा देत, दिव्यांगांच्या अडी अडचणी सोडवण्यासाठी महापालिका प्रशासन नेहमीच प्रयत्न करतो. दिव्यांग बाधवांचे सर्वेक्षण लवकरच करण्यात येणार असून मोफत थेरीपी सेंटरदेखील सुरू करणार असल्याचे सांगितले. यावेळी दिव्यांग विभाग उपायुक्त संजय जाधव, समाज कल्याण अधिकारी प्रशांत गव्हाणकर, कल्याण पंचायत समितीच्या जिल्हा समन्वयक अरुणा पाटील, गट समन्वयक विधा नाईकवाडे, तसेच अपंग विकास महासंघाचे सचिव लक्ष्मण शिर्के, माधुरी क्षीरसागर यांच्यासह असंख्य दिव्यांग बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# झी स्टुडिओज आणि रिंकू राजगुरू पुन्हा एकत्र

## 'जिजाई' चित्रपटाचा मुहूर्त सोहळा संपन्न

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता मुंबई(प्रतिनिधी) :**
झी स्टुडिओज आणि कोकोनट फिल्म्स निर्मित 'जिजाई' हा बहुप्रतीक्षित चित्रपट लवकरच प्रेक्षकांसमोर येणार आहे. नुकत्याच संपन्न झालेल्या चित्रपटाच्या मुहूर्त सोहळ्याने 'जिजाई'बद्दल प्रेक्षकांमध्ये उत्सुकता निर्माण केली आहे. नुकताच जिजाई चित्रपटाच्या मुहूर्त सोहळ्याचा फोटो सोशल मीडियावर पोस्ट करण्यात ला असून नवोदित दिग्दर्शक तृशांत इंगळे दिग्दर्शित या चित्रपटात 'सैराट फेम' रिंकू राजगुरू प्रमुख भूमिकेत दिसणार आहे. तर अपूर्वा शाळीग्राम या चित्रपटाच्या डीओपी आहेत. कपाळी चंद्रकोर लावलेली रिंकू या चित्रपटात एका वेगळ्याच अंदाजात दिसणार आहे. 'सैराट'च्या यशानंतर रिंकू राजगुरू आणि झी स्टुडिओज यांच्यात एक वेगळं नातं निर्माण झालं आहे. आता या जोडीने पुन्हा एकदा 'जिजाई'च्या माध्यमातून प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवण्याचा निर्धार केला असून हा नवीन चित्रपट लवकरच प्रकारांच्या भेटीला येणार आहे. हा चित्रपट कधी प्रदर्शित होणार, याची आता प्रेक्षक आतुरतेने वाट पाहात आहेत. झी स्टुडिओजचे बवेश जानवलेकर म्हणतात, ''झी स्टुडिओजने नेहमीप्रमाणे नवोदितकलाकारांना आणि दिग्दर्शकांना व्यासपीठ उपलब्ध करून देऊ असते. झी स्टुडिओजने प्रेक्षकांसाठी कायमच दर्जेदार आणि वेगळया आशयाचे चित्रपट सादर केले आहेत. 'जिजाई' हा त्याच परंपरेचा भाग आहे.''

# मिलिंद पाटील यांना वसंत स्मृती आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :**
वसंत स्मृती आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळयाचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष कोकण पदविधर मतदारसंघाचे आमदार ॲड निरंजन डावखरे यांनी सर्वांचे स्वागत केले. यावेळी शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, निलिमा डावखरे, शिक्षण क्रांती संघटेनेचे अध्यक्ष सुधीर घागस, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, मनिष पाटील, गायत्री पाटील उपस्थित होते.

यावेळी शैक्षणिक, सामाजिक, राष्ट्रीय कार्यातील भरीव योगदानाबद्दल शाळेतील विद्यार्थीना व युवकांना तंबाखू आणि तंबाखूजन्य पदार्थांच्या दुष्परिणाम बद्दल मार्गदर्शन, व्यसनाविरोधात प्रचार, प्रसार, प्रबोधन, व्यक्तीचे मतपरिवर्तन करून त्यांना निर्व्यसनी बनविण्यासाठी युवकांपुढे तसेच समाजापुढे व्यसनमुक्तीचा संदेश जावा यासाठी पथनाट्य स्पर्धा, रॅली, तंबाखू मुक्त संकल्पना, तंबाखुमूक्त शाळा, शैक्षणक्षेत्रातील उल्लेखनीय व वैशिष्ट्ये पूर्ण कार्याची दखल घेऊन कल्याण तालुक्यातील मिलिंद पाटील यांना वसंत स्मृती आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याबद्दल शाळेतील शिक्षक आणि विद्यार्थी, पालक मित्रपरिवार सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## महावितरणच्या टिटवाळा उपविभागातील

# ८७ वीज चोरांविरुद्ध गुन्हे दाखल २४ लाखांची वीजचोरी उघड

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :**
महावितरणच्या टिटवाळा उपविभागात वीज चोरांविरुद्ध सातत्याने कारवाई सुरू आहे. गेल्या नोव्हेंबर महिन्यात केलेल्या तपासणीत ८७ जणांकडे २४ लाख २० हजार रुपयांची वीजचोरी आढळली. या सर्व ८७ जणांविरूद्ध वीज कायदा २००३ च्या कलम १३५ नुसार मुरबाड पोलिस ठाण्यात वीजचोरीचा गुन्हा दाखल झाला आहे.

कल्याण परिमंडलाचे मुख्य अभियंता चंद्रमणि मिश्रा आणि कल्याण मंडल दोनचे अधीक्षक अभियंता दिलीप भोळे, कल्याण ग्रामीण विभागाचे कार्यकारी अभियंता विनय काळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. मांडा-टिटवाळा शाखा कार्यालयांतर्गत टिटवाळा मंदिर परिसर, बल्याणी, बनेली, मांडा पश्चिम भागातील ४० तर गोवेली शाखेंतर्गत म्हारळ व वरप भागात ३३ जणांकडे तसेच खडवली परिसरात १४ जणांकडे वीजचोऱ्या आढळून आल्या. चोरीच्या विजेच्या देयक व दंडाच्या रकमेचा भरणा टाळणाऱ्या या ८७ जणांविरुद्ध दिलेल्या फिर्यादीनुसार मुरबाड पोलिसांनी गुन्ह्याची नोंद केली आहे. टिटवाळा उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता गणेश पवार, सहायक अभियंते धनंजय पाटील, निलेश शिर्के, तुकाराम घोडविंदे, कनिष्ठ अभियंते सचिन पवार, अलंकार म्हात्रे आणि त्यांच्या टिमने ही कामगिरी केली.

# देव्हाऱ्यात आढळलेल्या भल्यामोठया सापाला सर्पमित्राने दिले जीवनदान

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :**
एक भलामोठा साप उब घेण्यासह भक्ष्याच्या शोधात चक्क बंगल्यातील देव्हाऱ्यात दडून बसल्याची घटना समोर येताच बंगल्यातील कुटुंबांनी जिवाच्या भीतीने पळ काढला होता. ही घटना कल्याण पश्चिम भागातील सापर्डे गावातल्या एका बंगल्यात घडली आहे. तर भल्यामोठ्या सापाला सर्पमित्र दत्ता बोंबे यांनी देव्हाऱ्याच्या कप्प्यातून शिताफीने पकडून त्याला पिशवीत बंद करताच भयभीत झालेल्या कुटूंबाने सुटेकचा निश्वास सोडला.

विषारी बिन विषारी साप थंडीच्या दिवसात उब मिळावी तसेच भक्ष्याच्या शोधात मानवी वस्तीत शिरत असल्याच्या घटना थंडीच्या दिवसात सातत्याने घडतच आहे. आजही कल्याण पश्चिम भागातील सापर्डे गावात थळे कुटूंबाचा आलिशान बंगल्यात भलामोठा साप शिरला होता. मात्र साप घरात शिरताना कोणाच्या दृष्टीत पडला नसल्याने हा साप आदी बेडरूममध्ये त्यानंतर बंगल्यातील देव्हाऱ्यातील पूजेच्या वस्तू ठेवणाऱ्या कप्प्यात दडून बसला होता. सकाळी देवपूजा करण्यासाठी बंगल्यातील एका



सदस्यांनी पूजा करण्यासाठी देव्हाऱ्या समोर बसून कप्प्यातील अगरबत्ती काढताच त्यांना भलामोठा त्या कप्प्यात आढळून आला. हा साप पाहून ते भयभीत होऊन बंगल्यातून बाहेर पळ काढत देव्हाऱ्यात भलामोठा साप असल्याची माहिती इतर सदस्यांना देताच त्यांनाही बाहेर पळ काढला. त्यानंतर बंगल्याचे मालक थळे यांनी सर्पमित्र दत्ता बोंबे यांना संपर्क करून देव्हाऱ्यात भलामोठा साप असल्याची माहिती दिली.

माहिती मिळताच सर्पमित्र दत्ता हे घटनास्थळी येऊन कप्प्यात दडून बसलेल्या सापाला शिताफीने पकडून पिशवीत बंद केले. साप पडकल्याच पाहून थळे कुटूंबाने सुटेकचा निश्वास घेतला.

दरम्यान, हा साप धामण जातीचा असून ६ फूट लांबीचा आहे. या सापाची माहिती कल्याण विभागातील वन अधिकाऱ्यांना दिली असून त्यांच्या परवानगीने या सापाला पुन्हा निर्सगाच्या सानिध्यात सोडल्याची माहिती सर्पमित्र दत्ता बोंबे यांनी दिली आहे. आपल्या परिरात साप दिसल्यास नजीकच्या अग्निशमन दलाच्या कार्यालयात अथवा सर्पमित्रांना याची माहिती तातडीने दिल्यास पुढील अनर्थ टळू शकतो असे आवाहन त्यांनी केले आहे.






# लेट-लतीफ शिक्षकांवर कारवाई करा

## आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांचे मनपा प्रशासनाला आदेश



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

कल्याण : कल्याण डोंबिवली पालिकेच्या शाळांमधील नियमित वेळेत न येणाऱ्या शिक्षकांवर कठोर कारवाई करण्यात यावी. समज देऊनही शिक्षक वेळेत शाळेत येत नसेल तर अशा शिक्षकांना निलंबित करा, असे आदेश कल्याण डोंबिवली पालिकेच्या आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी सोमवारी पालिका शिक्षण विभागाच्या उपायुक्तांना दिले.

पालिका आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी सोमवारी कल्याणमधील धाकटे शहाड, घोलपनगर भागातील मिलिंदनगर, बारावे येथील कल्याण डोंबिवली पालिकेच्या मराठी शाळांना भेटी दिल्या. या भेटीच्यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांच्या वर्ग खोल्यांची स्थिती, शाळेची इमारत, शाळेतील भौतिक सुविधा, शाळा परिसरातील पटांगण, खेळ साहित्य सुविधांची पाहणी केली. यावेळी त्यांनी शिक्षक, विद्यार्थ्यांशी संवाद साधला. या शाळांमध्ये भरलेल्या विज्ञान प्रदर्शनातील प्रकल्पांची पाहणी केली. विद्यार्थ्यांनी त्यांना आपल्या प्रकल्पांची माहिती दिली. विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रकल्पांविषयी प्रश्न करून आयुक्त डॉ. जाखड यांनी विद्यार्थ्यांमधील कौशल्ये जाणून घेतली.

विद्यार्थ्यांचा क्रमिक अभ्यासक्रम विहित वेळेत पूर्ण झाला पाहिजे. यासंदर्भात मुख्याध्यापक, शिक्षकांनी तत्पर असले पाहिजे. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देता येईल यादृष्टीने शिक्षकांनी प्रयत्न करावेत, अशा सूचना त्यांनी शाळाप्रमुख, शिक्षकांना केल्या. शाळेत नियमित वेळेत न येणाऱ्या शिक्षकांवर कठोर कारवाई करण्याच्या, प्रसंगी त्या शिक्षकाला निलंबित करा. विनापरवानगी गैरहजर, रजेवर राहणाऱ्या शिक्षकांची विनावेतन रजा मंजूर करण्याबाबत कठोर भूमिका घ्यावी, असे आदेश आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी शिक्षण विभागाचे उपायुक्त प्रसाद बोरकर यांना दिले.

पालिका शाळांमधील पटसंख्या वाढविण्यासाठी शिक्षकांनी प्रयत्न करावेत. शाळेतील शैक्षणिक सुविधा सुसज्ज ठेवणे, शाळेची इमारत सुस्थितीत ठेवण्याच्या सूचना आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांना केल्या. यावेळी शिक्षण विभागाचे उपायुक्त प्रसाद बोरकर, प्रशासनाधिकारी रमेश चव्हाण, शिक्षणाधिकारी विजय सरकटे आणि इतर अधिकारी वर्ग उपस्थित होता.

## आसनगाव -कसारा लोकल सेवेला एक्सप्रेसचा अडथळा

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता :** शहापूर - आसनगाव ते कसारा मार्गावर लोकल फेऱ्यांमध्ये वाढ होत नसल्यामुळे प्रवाशांमध्ये नाराजी पसरलेली असतानाच, त्यात आता सुरु असलेल्या लोकल फेऱ्यांच्या वेळापत्रकात वंदेभारत आणि इतर एक्सप्रेस गाड्या सोडल्या जात आहेत. त्यामुळे लोकल गाड्या उशिराने धावत आहेत. तर, जलद लोकल गाड्याही धिम्या मार्गावरुन चालवल्या जात असल्याने नोकरदार वर्गाला कामाला पोहोचण्यास दररोज उशीर होत आहे. रेल्वे प्रशासनाच्या या भोंगळ कारभाराविरोधात प्रवाशांचा रोष वाढत असून, संतापाचा उद्रेक होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. गेल्या अनेक वर्षांपासून आसनगाव आणि कसारा लोकल फेऱ्यांमध्ये वाढ करणार नसल्यामुळे मध्यरेल्वे प्रशासनाने यंदाही आसनगाव - कसाऱ्याला सापत्न वागणूक देऊन प्रवाशांच्या संतापात भर घातली आहे. नुकत्याच प्रसिद्ध करण्यात आलेल्या वेळापत्रकात आसनगाव आणि कसाऱ्याकडे जाणाऱ्या लोकल फेऱ्यांमध्ये देखील वाढ करण्यात आली नसल्याने मध्य रेल्वे प्रशासनाविरोधात प्रवाशांमध्ये कमालीचा असंतोष पसरला आहे.

## राज्यात देवेंद्र पर्वाचा शुभारंभ!

पान १ वरून ▶▶ विविध क्षेत्रात नाविन्यपूर्ण कामगिरी करुन आपला ठसा उमटवणा-या दिग्गजांनाही या कार्यक्रमाचं निमंत्रण होतं. त्यामुळे अशा शेकडो दिग्गज व्यक्तीमत्त्वांनी या भव्य कार्यक्रमाला हजेरी लावली. या नव्या पर्वात देवेंद्र फडणवीस लाडकी बहीण योजना, जलयुक्त शिवार योजना अशा महत्त्वाकांक्षी योजनांना नवं वळण देतात का? ते पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे. तसेच महाराष्ट्रातील तरुणांचा रोजगार हा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. महाराष्ट्रातील तरुणांना रोजगार कसा मिळेल, राज्यातील विविध भागांमध्ये पाणीटंचाईचं संकट कसं दूर होईल, शेतक-यांना हवा तितका हमीभाव देण्यापासून मराठा, ओबीसी आणि धनगर आरक्षणांच्या मुद्द्यांचं मोठं आव्हान देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर असणार आहे.

## शपथ घेतल्यानंतर पहिल्या ..

पान १ वरून ▶▶ मुख्यमंत्र्यांनी पहिली स्वाक्षरी मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या फाईलवर केली. पुणे येथील रुग्ण चंद्रकांत शंकर कुऱ्हाडे यांना पाच लाखाची मदत मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीतून देण्याचे निर्देश त्यांनी फाईलवर दिले आहेत. चंद्रकांत कुऱ्हाडे यांच्या पत्नीने बोन मॅरो ट्रान्सप्लांट उपचारासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून अर्थसहाय्य देण्याची विनंती केली होती.

## म्हाडाची १४ हजार घरे...

पान १ वरून ▶▶ त्याचवेळी विधानसभा निवडणुकांसाठी लागलेली आचारसंहिता आणि जाहिरातीस मर्यादा आल्याने या घरांच्या जाहिरातीकडे अनेकांनी पाठ फिरवली. त्यामुळे या घरांना प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे या योजनेतील १४ हजार ०४७ घरे प्रतिसादाअभावी पडून आहेत, अशी माहिती कोकण मंडळातर्फे देण्यात आली आहे. त्यामुळे या घरांची विक्री करण्यासाठी आता म्हाडा कोकण मंडळाने पुन्हा एकदा नवी मोहिम हाती घेतली आहे. येत्या २ डिसेंबर ते १२ डिसेंबर २०२४ या काळात म्हाडाच्या कोकण मंडळातर्फे विशेष मोहिम राबवण्यात येते आहे.

आता प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर ही घरे विक्री केली जाणार आहेत. वसई-विरार महानगरपालिका हद्दीतील विरार-बोळींज आणि ठाणे जिल्ह्यातील कल्याण तालुक्यातील मौजे शिरढोण, मौजे खोणी, तसेच मौजे भंडार्ली, मौजे गोठेघर येथे ही घरे उपलब्ध आहेत. या अभियानांतर्गत म्हाडाचे कर्मचारी नागरिकांना गृहप्रकल्पांची माहिती देणार आहे, शिवाय म्हाडाच्या या योजनेतील घरांसाठी नोंदणी व अर्ज करण्यासंदर्भात मार्गदर्शन देखील करणार आहे. कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या मुख्य अधिकारी श्रीमती रेवती गायकर यांनी नागरिकांना, हक्काच्या घराचे स्वप्न साकार करण्याकरिता या मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

**मोहिम नेमकी कशी**

म्हाडा कोकण मंडळातर्फे सदनिकांची माहिती lottery.mhada.gov.in या संकेतस्थळावर देण्यात आली असून तेथे नोंदणीही करता येणार आहे. सोबतच मंडळातर्फे आता विविध २९ ठिकाणी स्टॉल उभारण्यात आले असून तेथे मंडळाचे कर्मचारी या योजनेबद्दल माहिती देतील. वसई विरार, मीरा भाईंदर, उल्हासनगर, नवी मुंबई, कल्याण डोंबिवली, ठाणे आणि पालघर महापालिकांच्या कार्यालयात, तहसिल कार्यालयात, उपविभागीय कार्यालयात हे स्टॉल लावण्यात आले आहेत.

## विधिमंडळाचे अधिवेशन...

पान १ वरून ▶▶

मंत्रिमंडळाचा विस्तार हा ११ डिसेंबर किंवा १२ डिसेंबरला होऊ शकतो. विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन हे १६ डिसेंबरपासून नागपूरमध्ये सुरू होणार आहे.

हे अधिवेशन २१ डिसेंबरपर्यंत सुरू राहणार आहे. देवेंद्र फडणवीस हे चहापाण्यासाठी विरोधी पक्षाच्या आमदारांना प्रथेप्रमाणं १५ डिसेंबरला निमंत्रित करणार आहेत. महायुतीमधील सूत्राच्या माहितीनुसार अजित पवार यांना पूर्वीप्रमाणं अर्थ आणि नियोजन खाते मिळू शकते. अजित पवार हे अधिवेशनात पुरवण्या मागण्यांचे प्रस्ताव सादर करू शकतात. कल्याणकारी योजना आणि विविध विकासकामांसाठी लागणाऱ्या खर्चासाठी ते गरजेचं आहे. त्यामध्ये लाडकी बहीण योजनेसाठी लागणाऱ्या निधीचादेखील समावेश आहे. राज्य सरकार शेतकऱ्यांचे पीककर्ज पूर्णपणे माफ करू शकते. तसेच जीवनावश्यक वस्तुंचे दर स्थिर करण्यासाठी रोडमॅप जाहीर करू शकते. महायुतीनं विधानसभा निवडणुकीपूर्वी जाहीर केलेल्या दहा आश्वसनांची पूर्तता करण्यासाठी पावले उचलली जाणार असल्याचं महायुती मधील सूत्रांनी सांगितलं.

खातेवाटपासाठी महायुतीमध्ये रस्सीखेच सुरू-काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गृहखात्याची मागणी केली होती. मात्र, ही मागणी भाजपानं फेटाळली आहे. त्याबदल्यात भाजपानं नगरविकास खाते देण्याची तयारी दर्शविली आहे.

भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादीचा समावेश असलेल्या महायुतीमध्ये खातेवाटपावरून रस्सीखेच सुरू असल्याचे संकेत राष्ट्रवादीचे गटनेते पवार यांनी दिले.

## ५ वातानुकूलित बस...

पान १ वरून ▶▶

नागरिकांसह कल्याण- अंबरनाथ- बदलापूरकरांनाही होणार असल्याची माहिती वाहन विभागप्रमुख विनोद केणे यांनी दिली.

भाडेवाढ करून मिळत नसल्याने केष्ट्रल कंपनीचे राजा गेमनानी यांनी २०१४ मध्ये उल्हासनगर महानगरपालिका परिवहन सेवेचा गाशा गुंडाळल्याने सेवा ठप्प पडली होती. तेंव्हा तत्कालीन आयुक्त अजीज शेख मुख्यालय उपायुक्त अशोक नाईकवाडे यांच्या प्रयत्नाने निविदा प्रक्रिया हाताळण्यात आली. त्याचे फलित मिळाले आणि पुण्याच्या कंपनीला परिवहन सेवा हाताळण्याचे कॉन्ट्रॅक्ट देण्यात आले. कंपनीने प्रथम पुण्यातील भोसरीमध्ये २० बसेस तयार करण्याचे काम सुरू केल्यावर मार्च २०२४ मध्ये ३३ सिटर्स १० नॉन- ए.सी. बसेस शहरात दाखल झालेल्या असून त्या विविध मार्गावर धावू लागल्या आहेत.

त्यांनतर पुण्यामध्ये इन्फ्रास्ट्रक्चर मॅन अशी ओळख निर्माण केलेले विकास ढाकणे यांची आयुक्तपदी नियुक्ती झाल्यावर त्यांनी ए.सी बसेस शहरात आणण्यासाठी कंबर कसली. त्यासाठी अतिरिक्त आयुक्त किशोर गवस, वाहन विभागप्रमुख विनोद केणे यांनी पाठपुरावा केल्यावर गुरुवारी ५ तारखेला ३३ सिटर्सच्या १० ए.सी बसेसची एन्ट्री उल्हासनगरात झालेली आहे. या १० बसेस पैकी ५ बसेस ट्रायल बेसवर कल्याण-अंबरनाथ-बदलापूर या महामार्गावर धावणार असून काही दिवसांनंतर ह्या सर्व १० बसेस शहरातील विविध मार्गावर देखील धावताना दिसणार आहेत




# मतपत्रिकेद्वारे मतदान घेण्यासाठी शरद पवार गटाची राष्ट्रपतींना दहा हजार पत्रे

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

ठाणेः निवडणुका मतदान यंत्राद्वारे घेण्याऐवजी मतपत्रिकेद्वारे घेण्यात यावे, या मागणीसाठी राष्ट्रवादी (शरद पवार गट) ने बुधवारी ठाण्यात अनोखे आंदोलन केले. ईव्हीएम हटाओष्ठ लोकशाही बचाओ असा नारा देत राष्ट्रवादी (शरद पवार गट) विधिमंडळातील गटनेते जितेंद्र आव्हाड यांनी सामान्य नागरिकांची एकूण दहा हजार पोस्ट कार्ड राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना पाठविली. यामध्ये मतपत्रिकेद्वारे निवडणुका घेण्याची मागणी करण्यात आली आहे.




गेल्या काही निवडणुकांचा धांडोळा घेतल्यास मतदान यंत्र (ईव्हीएम) बाबत जनतेच्या मनात संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यातच प्रत्यक्ष मतदान आणि ईव्हीएममधील मतदान यामध्ये तफावत असल्याचीही काही प्रकरणे उघडकीस आली आहेत. ही बाब गंभीर असून निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर संशय निर्माण करणारी आहेत, असा आरोप करत राष्ट्रवादी (शरद पवार गट) ठाणे जिल्हाध्यक्ष सुहास देसाई यांनी बुधवारी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन केले. राष्ट्रवादी (शरद पवार गट) विधिमंडळातील गटनेते जितेंद्र आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली हे आंदोलन करण्यात आले. या कार्यालयासमोर हे स्वाक्षरी अभियान राबविण्यात आले.

या ठिकाणी कोरे पोस्टकार्ड ठेवून ईव्हीएम घोटाळ्याबाबत जनजागृती करण्यात आली. तसेच, नागरिकांना आवाहन करून राष्ट्रपतींना पत्र पाठविण्याचे आवाहन करण्यात आले. ' सामान्य भारतीय नागरिकांच्या मनात ईव्हीएमबाबत संशय अधिकाधिक गडद होत असल्याने भावी काळात लोक मतदानापासून दूर जाण्याची शक्यता असल्याने ईव्हीएमवर बंदी आणून जगभरात ज्या पद्धतीने मतपत्रिकेवर मतदान घेतले जात आहे. त्याच पद्धतीने भारतात मतपत्रिकेचा वापर करावा', अशा आशयाचा मजकूर या पोस्टकार्डवर लिहिण्यात आला होता. ही सर्व पोस्टकार्ड मुख्य डाक कार्यालयातील पत्रपेटीमध्ये डॉ.जितेंद्र आव्हाड यांनीच टाकली. ईव्हीएम हटाओष्ठ लोकशाही बचाओ असा नारा यावेळी देण्यात आला.

## ठाण्यातून गावठी हातबॉम्बचा साठा जप्त

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** ठाणे शहरात गावठी हात बॉम्बचा साठा पोलिसांनी जप्त केला आहे. याप्रकरणी पोलिसांनी रायगड येथील माणगाव भागातील एका तरूणाला ताब्यात घेतले असून पोलिसांनी त्याच्याकडून १० हात बॉम्ब जप्त केले आहेत. त्याच्या इतर साथिदारांचा पोलीस शोध घेत आहेत. हे गावठी हात बॉम्ब रानडुकरांच्या शिकारीसाठी वापरले जात असल्याचे त्याने पोलिसांना सांगितले. साकेत रोड परिसरात एकजण गावठी हात बॉम्ब घेऊन येत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली असता पथकांनी सापळा लावून सदर तरूणाला ताब्यात घेतले. त्याच्या बॅगेची तपासणी केली असता, बॅगमध्ये १० हात बॉम्ब आढळून आले. याप्रकरणात पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले असून त्याने हे हात बॉम्ब सातारा येथून आणल्याचे समोर आले आहे.




'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे तथा कार्यकारी संपादक विजय गोविंद यादव यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९१५८०७८६०१ E Mail – jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी